# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ७३-२३** **दिनांक :- ०३/०३/२०२३**

## ग्रीन विला रेस्टॉरन्ट ॲण्ड लॉजिंग आस्थापणेवर कारवाई करुन २ पिडित महिलांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कामगिरी .

दिनांक ०२.०३.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ग्रीन विला रेस्टॉरन्ट ॲण्ड लॉजिंग, स्टेला मारीस हॉस्पीटलचे बाजुस, उत्तन रोड, उत्तन, ता.जि.ठाणे या लॉज/हॉटेलचा चालक तपन सेन व मॅनेजर असे त्यांचे आस्थापणेमध्ये येणाऱ्या पुरुष गिऱ्हाईकांनी वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केल्यास महिलांना वेश्यागमनाचा व रुम भाडे असा मोबदला घेवुन वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करतात.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने पो.नि. श्री. समीर अहिरराव नेम. प्रभारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांना ग्रीन विला रेस्टॉरन्ट ॲण्ड लॉजिंग, स्टेला मारीस हॉस्पीटलचे बाजुस उत्तन रोड, उत्तन, ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन पंच व पोलीस पथकासह छापा कारवाई करुन ग्रीन विला रेस्टॉरन्ट ॲण्ड लॉजिंग/हॉटेलचे चालक तपन समीर सेन व स्टाफ यांनी वेश्यागमनाच्या मोबदल्यात बोगस गिऱ्हाईकास वेश्यागमनाकरीता ०२ महिला पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने ग्रीन विला रेस्टॉरन्ट ॲण्ड लॉजिंग/हॉटेलचा १) चालक तपन समीर सेन, वय-३२ वर्ष, २) मॅनेजर मुन्नाकुमार धानेश्वर सिंग, वय-२७ वर्ष, ३) वेटर साहिल अब्दुलकदुस इस्लाम, वय-३१ वर्ष, ४) वेश्यादलाल शाहबुल मोमताज मंडल, वय-३४ वर्ष यांना ताब्यात घेतले व पाहिजे आरोपी ग्रीन विला रेस्टॉरन्ट ॲण्ड लॉजिंगचे मालक राजश्री पाटील, रा. अंधेरी व वेश्यादलाल रमेश, रा. नायगाव यांचे विरुध्द स.फौ. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन उत्तन सागरी पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे दाखल करुना २ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त(गुन्हे),यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.पो.अंम. अश्विनी भिलारे, म.म.सु.ब. सोनाली मोरे सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----